CNR No. MHRG120004352022

नियमीत दिवाणी दावा क्र. २७/२०२२
शोभा वि. ग्रामस्थ सर्वे पंचकमिटी व इतर

**निशाणी क्र. ४६ कडील आदेश**

प्रस्तूतचा अर्ज प्रतिवादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ नुसार वादपत्र फेटाळण्यात यावे याकरीता दाखल केला आहे. अर्जातील थोडक्यात कथन असे आहे की, प्रस्तूतचा दावा प्रातिनिधीक स्वरुपात दाखल करण्यात आला असून दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ क्रम ८(२) ची पुर्तता करण्यात आलेली नाही. तसेच दावा विनिर्दिष्ट अनुतोष अधिनियम १९६३ कलम ३३ व ३९ या चुकीच्या कलमांखाली दाखल करण्यात आल्यामुळे प्रस्तूतचा अर्ज मंजूर करुन वादपत्र फेटाळण्याची मागणी केली आहे. वादीने आपले म्हणणे दाखल करुन दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम १ नियम ८ ची पुर्तता निशाणी क्र. २१ प्रमाणे केली असून कायद्याची कलम चुकले म्हणून दावा फेटाळण्यास पात्र ठरत नाही अशी हरकत घेवून अर्ज फेटाळण्यात यावा अशी मागणी केली आहे.

२. प्रतिवादीतर्फे विद्वान वकील श्री. डी. एन. पाटील आणि वादीतर्फे विद्वान वकील श्री. पी. एच. वर्तक यांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले असता वादीद्वारे निशाणी क्र. ८ कडील आदेशानुसार जाहिर नोटीस प्रसिध्द करण्यात आल्याचे निशाणी क्र. २१ कडील पेपर पब्लीकेशन वरुन दिसून येते.

याशिवाय दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ७ नियम ११ नुसार केवळ वादपत्रामध्ये दावा कोणत्या अधिनियमाखाली दाखल करण्यात आला याचे कलम चुकले म्हणून वादपत्र फेटाळले जाण्यास पात्र ठरत नाही. करिता मी खालील आदेश पारित करतो.

**आदेश**

१. अर्ज फेटाळण्यात येतो.

२. पक्षकारांनी अर्जाचा खर्च आपापला सोसावा.

(खुल्या न्यायालयात जाहिर)

SANDEEP G SARODE
Digitally signed by SANDEEP G SARODE
Date: 2023.08.18 18:15:14 +0530

(सं. गं. सरोदे)

दिनांक : १८/०८/२०२३

दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, मुरुड